PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chikat Navara
Year: 1994

Song: Thembe Thembe Tale Sache
Lyricist: Pravin Davane

ध्याना मध्ये ठेव लाडक्या
पैसा नसतो खर्चायचा
ध्यानामध्ये ठेव लाडक्या
पैसा नसतो खर्चायचा
पैसा पैसा करून हा पैसा
खूप असतो साठवायचा
खूप असतो साठवायचा
हा...
पैशाच्या या तालावर
दुनिया सारी नाचे
अहो पैशाच्या या तालावर
दुनिया सारी नाचे
थेंबे थेंबे तळे साचे
थेंबे थेंबे तळे साचे

बस ट्रेन ही महाग झाली
प्रवास करावा सायकलने
बस ट्रेनही महाग झाली
प्रवास करावा सायकलने
लिफ्ट मागूनी फुकटची
मी जातो रिक्षाने
जातो ऑटोरिक्षाने
शाळेमध्ये शिकतोस तेव्हा
जपून वापर शाई
शाळेमध्ये शिकतोस तेव्हा
जपून वापर शाई
खर्च नको शाईचा म्हणूनी
लिहीत वही मी नाही
शाळेत लिहीत वही मी नाही

एकच कपडा खरेदी केला
तोच धुवून घालायचा
एकच कपडा खरेदी केला
तोच धुवून घालायचा
उघडाबंब राहूनही
तोही कपडा टिकवायचा
तोही कपडा टिकवायचा
हां...पैशाच्या या तालावर
दुनिया सारी नाचे
हो पैशाच्या या तालावर
दुनिया सारी नाचे
थेंबे थेंबे तळे साचे
थेंबे थेंबे तळे साचे

एकच वेळा जेवून मी ही
बचत सारखी करतो
एकच वेळा जेवून मी ही
बचत सारखी करतो
पुन्हा पुन्हा देवळात जाऊन
प्रसाद खाऊन येतो
मीही प्रसाद खाऊन येतो
पेपर आणून शेजारून
नको परत रे देऊ
पेपर आणून शेजारून
नको परत रे देऊ
साठवून साठवून पेपर सगळे
रद्दीत विकून येऊ
पेपर रद्दीत विकून येऊ
पैशाच्या या रूळावरती

Literacy for a Billion

धावे जीवन गाडी
पैशाच्या या रूळावरती
धावे जीवन गाडी
नसेल पैसा ज्याच्या हाती
ठरतो तोच अनाडी
ठरतो तोच अनाडी
पैसा इंजिन असेल पुढे तर
डब्बे सगळे धावायचे
पैसा इंजिन असेल पुढे तर
डब्बे सगळे धावायचे

जमली जोडी तुमची आमची
हात कधी ना सुटायचे
हात कधी ना सुटायचे
हां पैशाच्या या तालावर
दुनिया सारी नाचे
हो पैशाच्या या तालावर
दुनिया सारी नाचे
थेंबे थेंबे तळे साचे
थेंबे थेंबे तळे साचे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*